कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २१.०५.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -१, दिनांक - २१.०५.२०१०**

**सभा क्रमांक -१, दिनांक -२५.०५.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती………………………………,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची सभा, **मंगळवार,दिनांक -२५.०५.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **पावसाळयामध्ये निर्माण होणा-या आपत्कालीन समस्यांबाबत (नालेसफाई,धोकादायक इमारती, पावसाच्या पाण्याचा निचरा इ.)तसेच कळवा प्रभाग क्षेत्रातील रस्त्यांवर निर्माण झालेल्या वाहतुक समस्येवरील उपाययोजनेबाबत विचारविनिमय करण्यासाठी** तसेच **सभा सुचना क्रमांक -१,दिनांक - २१.०५.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समिती यांचे आदेशान्वये.**

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा सुचना क्रमांक - १, दिनांक - २१.०५.२०१० रोजीची विषयपत्रिका.**

| प्र. क्र | विषय |
|---|---|
| १ | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ११.०३.२०१० व दि. १५.०३.२०१०(विशेष सभा) रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक - २१.०५.२०१०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## परिपत्रक

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक ;- २६/५/२०१०.

प्रति,
श्री./श्रीमती ---------------------,
सन्मा. सदस्य / सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येते की, **मंगळवार दिनांक २५/५/२०१०** रोजी **सकाळी ११:३०** वाजता **यशवंत रामा साळवी ऑलम्पिक साईज तरण तलाव**, कळवा प्रभाग समिती सभागृहात सभा सुचना क्रमांक - १ दिनांक २१/५/२०१० रोजीच्या विषय पत्रिका वरील सभा क्रमांक - १ दिनांक २५/५/२०१० रोजी आयोजित करण्यात आलेली सभा मा. नगर विकास मंत्री महोदय साहेब यांचा ठाणे महानगरपालिका (कळवा प्रभाग समिती) पाहणी दौरा असल्याकारणाने पुढे ढकलण्यात आलेली होती.

सदरची सभा **सोमवार दि. ३१/५/२०१०** रोजी **सकाळी ११:३०** वाजता **यशवंत रामा साळवी ऑलम्पिक साईज तरण तलाव**, कळवा प्रभाग समिती सभागृहात सभा सुचना क्र. १ दि. २१/५/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेतील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करणेत येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**मा. अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समिती यांच्या आदेशान्वये.**

प्रभाग अधिकारी
कळवा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

कळवा प्रभाग समिती कार्यालय
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २६/५/२०१०.

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ३१.०५.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -१, दिनांक - २१.०५.२०१०**

**सभा क्रमांक -१, दिनांक -३१.०५.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती………………………………,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची **दि.२५.५.२०१० रोजीची रद्द करण्यांत आलेली** सभा, **सोमवार, दिनांक -३१.०५.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -१ ,दिनांक - २१.०५.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्तांत पुढीलप्रमाणे :-

सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | मा. अध्यक्ष |
| २. | श्री. मनोज विठ्ठल लासे | - | मा. उप-महापौर |
| ३. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| ५. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ६. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ७. | ॲड. सौ.अनिता सुनील गौरी | - | सन्मा. सदस्या |
| ८. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ९. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |
| १०. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य अनुपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | श्री. राजेश आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| १२. | श्री. गणेश यशवंत साळवी | - | सन्मा. सदस्य |
| १३. | श्री. मिलिंद भारत पाटील | | सन्मा. सदस्य |
| १४. | सौ. मनिषा महेश साळवी | - | सन्मा. सदस्या |
| १५. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| १६. | सौ. अपर्णा मिलिंद साळवी | - | सन्मा. सदस्या |
| १७. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| १८. | श्री. हेंमंत आत्माराम खारकर | - | स्विकृत सदस्य |

**वंदे मातरम्‌ने सभेला सुरुवात करण्यात येते.**

* * * * *

**मा.उप प्रभाग अधिकारी विषयपत्रिका व प्रकरण क्रमांक १ वाचून दाखवितात.**

| प्र. क्र | विषय |
|---|---|
| १. | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ११.०३.२०१० व दि. १५.०३.२०१०(विशेष सभा) रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |

**प्रकरण क्रमांक १ - मंजूर**

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, पावसाळयामध्ये निर्माण होणा-या आपत्कालीन समस्यांबाबत नालेसफाई, पावसाच्या पाण्याचा निचरा इ.तसेच कळवा प्रभाग क्षेत्रातील रस्ते दुरुस्तीबाबत काय उपाययोजना केली आहे ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.उपमहापौर यांनी विचारल्याप्रमाणे कळवा प्रभाग समिती अंतर्गत पावसाळया पूर्वीची (प्रामुख्याने नालेसफाई )कामे हाती घेतली आहेत. तसेच विविध प्रभागांमध्ये २६ नाले आहेत ते घेतलेले आहेत. विटावा, खारेगांव व कळवा अश्या तीन पेटया आहेत तेथे वेगवेगळे ठेकेदार नियुक्त करुन दि.१४ मे पासून नालेसफाईच्या कामाला सुरुवात केली आहे. त्या व्यतिरीक्त रेल्वेचे कल्व्हर्ट साफ करण्यासाठी वेगळी एजन्सी नियुक्त केली आहे. हायवेला चर मारण्यासाठी वेगळी एजन्सी लावलेंली आहे.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, हायवेच्या नाल्यांची साफसफाई व्यवस्थित झाली पाहिजे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.उपमहापौर साहेब, आपण पाहणी केली आहे . परत एकदा पाहणी करु या.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, पारसिकनगरमध्ये दोन आऊटलेट आहेत त्यांची साफसफाई पूर्ण झालेली नाही.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.उपमहापौर साहेब,स्वामी समर्थ मठाच्या येथील आपण आय.एन.डी.पी.अंतर्गत नवीन कल्व्हर्ट बांधतोय. आत्माराम चौकाच्या येथील कल्व्हर्ट व बॉक्स कल्व्हर्ट, हायवे बायपास मधील कल्व्हर्ट , टोलनाका येथील कल्व्हर्ट यांची साफसफाई झालेली आहे. तरी आपण पुन्हा पाहणी करुन घ्या. काही काम राहिले नाही परंतू आवश्यकता असेल त्याप्रमाणे करुन घेऊ.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, हायवेच्या साईडने सर्व्हिस रोडवर चर मारणार होते त्याचे काय झाले ? टोल नाक्यापासून चर मारणे आवश्यक आहे. तेथे यावेळी नक्की पावसात पाणी भरणार आहे. तेव्हा चर मारुन घ्या. दोन तारखेपासून मी हे काम सांगतो आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, खारेगांव नाका ते विटाव्यापर्यंत चर मारलेले आहेत व डाव्या बाजूस जो चर मारायचा राहिला होता ते काम करुन घेतो.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, विमलनगरच्या समोर साफसफाई करणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, आज माणसे उतरवून साफ करुन घेतो.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समितीअंतर्गत इतर प्रभागातील कामे पूर्ण झाली नसतील तर तीही लवकरात लवकर करुन घ्या. ड्रेनेज विभागानेही काही रस्ते खणून ठेवले आहेत.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, उप महापौरांच्या प्रभागातील रघूकुलच्या येथील रस्ता राहिलेला आहे, गौरी मॅडमच्या प्रभागातील चाहू दादा पाटील रस्ता राहिलेला आहे. ड्रेनेज विभागाने जे रस्ते खणले आहेत त्याचे काम तेच करणार, आपण नाही. मा.अध्यक्षांच्या प्रभागतही दोन-तीन ड्रेनेजची कामे चालू आहेत.

**मा.अध्यक्ष :-**

एम.एम.आर.डी.ए.ने जे रस्ते खणले आहेत त्या रस्त्याचे काम कोण करणार ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, ड्रेनेज विभाग रस्ते दुरुस्त करणार कारण त्यांच्या टेंडरमध्ये पाईपलाईन टाकल्यानंतर रस्ते व्यवस्थित करणे हे काम आहे. आपण करु शकत नाही.

**मा.अध्यक्ष :-**

या आधि एक रस्ता आपल्याकडून दुरुस्त केलेला आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, सूर्यनगरचा रस्ता दुरुस्त केला होता या रस्त्याबाबत त्यांना आम्ही कळविले आहे की, आपण मागासवर्गीय कामांमध्ये हा रस्ता घेतलेला होता तो आम्ही दुरुस्त केलेला आहे. तेव्हा ते हा रस्ता करणार नाहीत. परंतू गणपती पाडयाचा रस्ता आपण घेतलेलाच नाही. त्यामुळे त्यांचेमार्फतच होईल.

**मा.अध्यक्ष :-**

गजानन नगरच्या येथे खोदलेला रस्ता आहे त्याबाबत काय ? पावसाळयात परिस्थिती बिकट होणार आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, ब-याचश्या प्रभागामध्ये ड्रेनेजची कामे चालू आहेत.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, सिव्हरेजचे काम तेच पूर्ण करणार हे बरोबर आहे परंतू काम पूर्ण करणार केव्हा ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, सहयाद्रीच्या समोरही मेन रोड खोदला होता. त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण त्यांनी पूर्ण केले आहे. मा.अध्यक्षांच्या प्रभागातील सूर्यनगरच्या रस्त्याबाबत मी ढोले साहेबांना घेऊन आलो होतो. त्यांनी सूर्यनगरचा रस्ता दुरुस्त केला परंतू गणपती पाडयाचा रस्ता राहिलेला आहे.

**मा.अध्यक्ष :-**

रस्त्यावरील माती उचलण्याबाबत सर्व नगरसेवकांनी सांगितले होते त्याचें काय केले ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा चौक ते खारेगांव नाका या मेन रोडवर जी माती टाकली होती ती उचलली आहे.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, रेतीबंदर सर्कल ते राजपार्क येथे माती आहे तीही उचला.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,खारेगांव नाक्यापर्यंत भरपूर माती होती ती सर्व साफ केली. या आठवडयामध्ये त्या पुढच्या भागातील माती उचलून काम संपवून टाकू.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,हा प्रश्न उपमहापौरांनी मागच्या सभेमध्ये घेतला होता. आठ दिवसांवर पावसाळा आला आहे आणि कार्य.अभियंता सांगतात की दोन दिवसांत माती उचलणार म्हणजे कामाची प्रगती काय आहे ? कळवा नाका ते आत्माराम चौक या ठिकाणी रस्ते खोदलेले आहेत ११ ते १२ कोटीचे सिमेंट कॉक्रीटकरणचे काम करीत आहेत परंतू दोन्हीकडून कुठेही फुटपाथ नाही की पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना नाही. याचाही कुठे विचार करणार आहात की नाही ते सांगा.

मा.अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समितीमध्ये ८५ कर्मचारी होते परंतू आता ४० कर्मचारी राहिलेले आहेत. म्हणजे ४५ कर्मचारी कमी आहेत. हे ४० कर्मचारी कुठे कुठे काम करणार आहेत ? याचा विचार झाला पाहिजे. प्रभाग क्र. ५१ व ५२ मध्ये साफसफाई होत नाही याबाबत मी पत्रही दिलेले आहे. ठेकेदार आतील रस्ते साफ करीत नाही. कर्मचारी सांगतात की हा भाग आमचा नाही. प्रत्येकवेळी पटनाईक यांना फोन करु शकत नाही. माझ्या प्रभागामध्ये प्रेमनगर, साईनगरमध्ये आठवडयातूनही साफसफाई होत नाही. प्रत्येकवेळी पटनाईक यांना सांगितल्यानंतर कामगार काम करतात याचा अर्थ काय ?

आकाशी साहेब, माझ्या प्रभागामधील दत्तवाडी पासून ते आत्माराम चौकापर्यंत फुटपाथ फेरिवाल्यांनी,गॅरेजवाल्यांनी भरलेला आहे. त्यांची दादागिरी वाढलेली आहे. फुटपाथ हा जनतेला चालण्याकरिता आहे. तरी पहिल्यांदा त्यांना हटवा.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

मा.अध्यक्ष महोदय, पारसीक रोडवर, सहयाद्री च्या येथे प्रायव्हेट बसेस उभ्या असतात, तेथे गाडया दुरुस्तीचे कामही केले जाते. शिवाजी हॉस्पीटलच्या येथेही प्रायव्हेट बसेस उभ्या असतात.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, खारेगांव तलावाजवळही १५ ते २० बसेस उभ्या असतात. तेथील गॅरेज हटवा.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, तेथील गॅरेज ताबडतोब हटवा. त्यामुळे तेथे गाडया उभ्या रहातात.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आपण खारेगांव ते आत्माराम चौकापर्यंत ११ कोटीचे काम केले. परंतू तेथे फुटपाथ नाही, पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार नाही,उपाययोजना नाही. येणारे पाणी जाणार कुठे ? याबाबत काय करणार ते सांगा ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा चौक ते आत्माराम पाटील पर्यंत प्रकल्प विभाग,मुख्य कार्यालयाकडून रस्त्याचे काम झालेले आहे. मी लाला साहेबांना सांगितले आहे की, कळवा चौक ते आत्माराम पाटील पर्यंत दोन्ही बाजूला फुटपाथ नाही किंवा गटारही नाही. त्याचा प्रस्ताव आता आम्ही तयार केलेला आहे. बजेट उपलब्ध होऊन मंजूरी मिळाली की काम करुन घेऊ. तीन, सव्वा तीन कोटीचा प्रस्ताव आहे. काही गटारे आपण मागासवर्गीय मधून केलेली आहेत. उर्वरित आहेत ती करावयाची आहेत.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे असे आहे की, ११ कोटीचे काम केले तेथे फुटपाथ नाही, गटार नाही. दत्तवाडीत नाला आहे तिथेही पाणी जाऊ शकत नाही. याबाबत महापालिकेची काय जबाबदारी आहे ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, नगर अभियंता यांचेकडे रोडचे काम चालु असताना सन्मा.सदस्य आले होते. तेथे ६-६ फुटाचे दोन रस्ते केले आहेत.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, रस्ते केले परंतू जे पाणी येणार ते थांबविण्याचे काम कोणाचे ? हे काम माझे नाही तुमचे आहे ?

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, या रस्त्याच्या प्रोजेक्टमध्ये फुटपाथ व गटार बांधून देणेही अंर्तभुत आहे. मग ही कामे का करीत नाहीत ?

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आपण रस्ता दुरुस्त करायचा आणि तो पुन्हा केबलवाले खोदून ठेवतात. खारेगांव तलावासमोर केबलचे काम सुरु होते त्यांचे काम झाल्यानंतर त्यांनी रस्त्याची लेवल का केली नाही ? वास्तविक हे त्यांचे काम आहे. मागे असेच पाण्याचे पाईपलाईनचे काम केले. ४ महिने झाले तेथे पेव्हर ब्लॉक टाकलेले नाहीत.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

पवार साहेब,जे रस्ते खोदलेले आहेत त्यांची व्यवस्थित लेवल करुन लवकरात लवकर घ्या.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, ब-याचश्या प्रभागात मा.उपमहापौर यांच्या प्रभागात, सन्मा.सदस्य उमेश पाटील यांच्या प्रभागात, मा.अध्यक्षांच्या प्रभागात कामे चालू आहेत. परंतू माझ्या प्रभागात रस्त्याचे असो की नाल्याचे असो एकही काम चालू नाही. ही कामे माझ्या प्रभागात कधी सुरु होणार ? आतापर्यंत किती कामे केली व कधी कामे सुरु करणार याबाबत मला माहिती मिळावी. काही ठिकाणी पुन्हा पुन्हा काम करता, तर काही ठिकाणी एकदाही काम झालेले नाही.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,सन्मा.सदस्यांच्या प्रभागात पालटूनच्या सहाय्याने उद्यापासून काम सुरु करणार आहोत. (फुले नगरचा नाला) उद्यापासून दोन दिवसांत काम होईल.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, मी फक्त माझ्या बाबतीत बोलत नाही तर सर्व सदस्यांबाबत बोलत आहे.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय,माझ्या प्रभागामधील पालटून मशीन आज बंद आहे. काल गाळ टाकायला जागा नाही असे सांगून पालटून मशिन बाहेर काढत होते. हे ठेकेदाराला आधि समजले नाही का ? काल सोसायटीने गाळ टाकायला परवानगी दिली आहे तेव्हा अर्धवट काम केले आहे. काल नागरिक माझ्याकडे आले व मी तेथे गेल्यानंतर काम सुरु केले. ठेकेदार काम न करता पालटून काढण्याचा निर्णय कसा घेऊ शकतो ? गेल्या १५ वर्षात गाळ काढून रेल्वेच्या हद्दीत टाकला जातो मात्र तो कधीही उचलला गेलेला नाही. आता दोन वर्षापासून गाळ तिथेच टाकतात व पाऊस आला की तो गाळ परत खाली येतो आणि ठेकेदाराला काहीही काम न करता सर्व पैसे अदा होतात, घाण सुकली तरीही उचलली जात नाही आणि ठेकेदाराला आपण काम सुरु केले याची कल्पना स्थानिक नगरसेवकांना दयावी असेही वाटत नाही. सोहम कन्स्ट्रक्शनमध्ये मी फोन केला तेव्हा त्यांनी सांगितले अर्जुन पाटील यांनी याचा ठेका घेतला आहे.

**श्री.मनोज लासे -मा.उप महापौर :-**

नितीन पवार, ठेकेदाराकडून संबंधित नगरसवेकांचे काम पूर्ण झाल्याचे संमती पत्र किंवा बिल अदा करण्यास परवानगी पत्र घ्या. त्यानंतरच ठेंकेदाराला बिल अदा करण्यांत यावे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, एन.ओ.सी. शिवाय आपण बिल अदा करीत नाही.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय,अर्धवट काम केल्यानंतर कशी एन.ओ.सी. देणार ?

**मा.अध्यक्ष :-**

माझ्या प्रभागात आनंदनगरमध्ये गाळ काढून ठेवला आहे तो उचलणार कधी ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,आज किंवा उद्या उचलून घेतो.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात दोन ठिकाणी माती पडलेली आहे ती पावसाळयाआधि उचलून घ्या. सुरजपार्क समोर आहे, उर्जा प्रतिक इमारतीसमोर ढीग आहे. डंपर आला तर जे.सी.बी.नाही, जे.सी.बी.आहे तर डंपर नाही असे चाललेले असते. जुनी मराठी शाळा,खाली उतरतो तेथील सगळी माती उचला कारण पावसाळयात तेथे चिखल होईल. उर्जा प्रतिक इमारतीच्या रस्त्याच्या समोरचे गटार कधीही पूर्ण साफ करीत नाहीत. तेही करुन घ्या.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय,उद्या डंपर लावून माती उचलून घेतो.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, आशिष गुप्ते,कनिष्ठ अभि.विद्युत हे जवळजवळ पाऊण महिना रजेवरच आहे. त्यांचा चार्ज कोणाकडे दिला आहे ?

**श्री.गुप्ता - विद्युत विभाग :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्याकडे गुप्ते यांचा तात्पुरता चार्ज दि.२१.५.१० पासून दिलेला आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील जितके जुने खांब आहेत ते आधि काढा व नविन बसवा. जुने खांब पावसाळयात पडतील.

**श्री. प्रभाकर पवार, सन्मा. स्विकृत सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, दत्तप्रगती, साईसृष्टी येथे कचरा पडलेला असतो तो उचला.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, एकात्मिक नाले योजनेअंतर्गत काम करताना लाईटचे सर्व पोल काढलेले आहेत. आता पावसाळा जवळ आला आहे. सुधीर म्हणून विद्युतचा ठेकेदार आहे,ज्यांने ठेका घेतला आहे त्यांना फोन करुनही ८-८ दिवस काम पहायला येत नाही.

एकात्मिक नाले योंजनेअंतर्गत रेल्वेची भिंत आपल्या प्रशासनाने रेल्वेला न विचारता तोडली, त्या भिंतीने आम्हांला पाण्यापासून संरक्षण होते. तेव्हा रेल्वेने आमची भिंत बांधून देण्यास सांगितले परंतू आता दोन महिनें झाले ती भिंत एक चतुर्थांशही बांधलेली नाही. आमच्या येथील गटारही तोडलेले आहे. ते छोटे आहे तेव्हा डिप करणे आवश्यक आहे. ठेकेदाराकडे माणसे नाहीत आणि जे काम सुरु आहे ते धिम्यागतीने चालले आहे त्यामुळे नागरिक भयभित झालेले आहेत. नागरिक मा.आयुक्तांकडे जाणार आहेत आता माझंही ते एकणार नाहीत. हिर्लेकरांनी सांगितले की,काम करतो. मी डोईफोडे यांनाही फोन केला होता. पाहणी करुन त्यांनी काय निर्णय घेणार ते सांगायला हवे होते. आज कळवा प्रभाग समितीची सभा आहे तेही सांगितले होते. साईटवर काम पहायला त्यांचा जे.ई.सुध्दा हजर नसतो. आय.एन.डी.पी.चं प्रोजेक्ट इतकं मोठं आहे आणि फक्त ७ ते ८ माणसे कामाला आहेत. दोन फिक्सींग मशीन आणल्या त्यातील एक बिघडलेलीच आहे. फक्त दोन बिल्डींगपर्यंत काम झाले आहे.५-६ बिल्डींगसाठी संरक्षक भिंत नाही आणि यावेळी पाणी एन.एम.एम.सोसायटीतून त्रिमुर्तीमधून सहयाद्रीमध्ये जाणार आहे. मी तेथेच रहात असल्यामुळे नागरिक दिवस पहात नाहीत की रात्र पहात नाहीत वारंवार येत असतात.

गाळ काढण्यासाठी पालटून लावले होते ते काही आज बहुधा बंद आहे. मी ठेकेदाराला फोन केला तेव्हा त्यांनी सांगितले की सकाळी ८ वाजेपर्यंत काम चालू होते परंतू मी रात्री १२च्या सुमारास गेले होते तेव्हा काम बंद होते. आता रेल्वेची भिंत तोडताना परवानगी न घेतल्यामुळे तेही परवानगी देत नाहीत. मी याबाबत मा.स्थायी समितीमध्ये बोलणार होते परंतू हिर्लेकर साहेबांनी सांगितले की मॅडम काही बोलू नका, मी काम करुन घेतो म्हणून मी सभेमध्ये बोलले नाही. जगताप म्हणून होते त्यांची आई वारल्यामुळे ते सध्या हजर नाहीत. तेव्हा मी हिर्लेकरांना विचारले हा एकच अधिकारी आहे का ? तेव्हा ते दुसरा अधिकारी देतो व काम सुरु करतो असे म्हणाले. एक दिवस काम चालू केले आता बंद आहे. प्रशासन गेंडयाच्या कातडीचे आहे असे मला सांगावेसे वाटते.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रभागामध्ये गटारे भरलेली आहेत त्याचे काय ? ती पावसाळयाआधि साफ झाली पाहिजेत. अधिकारी कुठे आहेत विचारले तर नाल्याच्या कामासंदर्भात गेले आहेत असे कळते. परंतू गटारांचे काय ?

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, एखादया सोसायटीच्या इथून संपूर्ण गावाचे ड्रेनेज जात असेल तर ते गटार साफ करणे आवश्यक आहे की नाही ! कामगार सांगतात हे आमच्याकडे येत नाही. मग साफ कोण करणार ? ते कामगार गटार साफ करण्यासाठी पैसे मागतात आणि तेथील नागरिक माझ्याकडे तक्रार घेऊन येतात. मारुती सोसायटीच्या येथे हा प्रॉब्लेम आहे व दर पावसात तेथे पाणी तुंबते.

**मा.अध्यक्ष :-**

कर्मचारी असे सांगतात की, आमच्या हद्दीत नाही तर मग काम कोण करणार ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, दोन दिवसांत काम करुन घेतो.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सभेमध्ये काम करतो असे सांगतात आणि बाहेर पडल्यानंतर विसरुन जातात, कामे होत नाहीत. आपल्या प्रभाग समितीमध्ये ८५ कर्मचारी होते त्यातील ४० कर्मचारी आहेत त्याबाबत काय केले ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, मुख्य कार्यालयातून टेंडर पास केले आहे. आपल्याकडे ८१ कर्मचारी होते. आता ४३कर्मचारी आहेत. कर्मचारी कमी आहेत.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

कर्मचारी वाढविण्याबाबत प्रस्ताव दिला आहे का ? तसा प्रस्ताव दया.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, दोन महिन्यापूर्वी प्रस्ताव दिलेला आहे.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

पुन्हा एकदा स्मरणपत्र दया. नवीन आयुक्त आले आहेत. खतगांवकर साहेबांकडे चर्चा करुन घ्या. कर्मचारी वाढवून देणार आहेत.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

आकाशी साहेब, दोन-तीन वर्ष पाहतोय आपल्या अधिका-यांकडे नियोजन नाही. कोणत्याही कामाचा पाठपुरावा करणे हे आमचे काम आहे का ? अधिका-यांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय,पावसाळयामुळे काही ठिकाणी गटारांची आम्ही साफसफाई करुन घेतली आहे व त्यानंतर पुन्हा कचरा झाला. वारंवार मी माणसे पाठविण्याबाबत फोन करतेय परंतू माणसे कमी असल्यामुळे कुठे कुठे पाठवणार ? माझ्या इथे साफसफई करण्यासाठी महिला आहेत त्या ४-४ दिवस येत नाहीत, सध्या लग्नसराई, गावाला जाणे यामुळे त्या नसतात. त्यामुळे प्रभागात साफसफाईचा पूर्णपणे बोजबारा उडाला आहे. पावसाळयासाठी जी गटारे बांधली आहेत त्यांची साफसफाई होणे महत्वाचे आहे.

**मा.अध्यक्ष :-**

दांडेकर साहेब आता कर्मचारी कमी आहेत तेव्हा साफसफाईबाबत तुम्ही काय करणार ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, १०-१० कामगारांची टीम बनविणार...

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

दांडेकर,तुमच्याकडे ४० कामगार आहेत त्यापैकी सर्व कामगार कामावर येतात का ? त्यांच्याकडून व्यवस्थित काम होते का हे पाहून घ्या.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, ४० मधील १० कामगार घरीच असतात.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रत्येक पेटीवर सकाळी भेट देऊन पहा की सर्व कर्मचारी हजर असतात का ?

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझी सन्मा. सदस्यांना विनंती राहिल की, त्यांनी निदर्शनास आणून दयावे की हे कर्मचारी आलेले नाहीत.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, आम्ही जेव्हा पेटीवर जातो तेव्हा कर्मचारी नसतील तर सांगतात प्रभागात कामासाठी गेले आहेत. त्यांच्या मागे कुठे फिरणार !

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, ठेकेदाराच्या कामगारांची ७ वा.हजेरी असते आणि आपल्या कामगारांची ७.३० वा. हजेरी असते. आपले ७ ते १० व १०.३० ते १.३० अशी कामाची वेळ आहे व ठेकेदाराचे ७.३० ते १२ व १२.३० ते ३ पर्यत कामाची वेळ आहे.

**श्री. पटनाईक,उप स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय,माझ्याकडे ७ नगरसेवक व ४० कामगार आहेत. त्यामध्ये गटार सफाई, रस्ते सफाई, कचरा उचलणे हे काम असते. कळवा पूल ते खारेगांव, महात्मा फुले पासून पूर्ण पट्टा याठिकाणी रोजच कामगार पाठवावे लागतात. आजची गटारांची अवस्था अशी आहे की, १० ते २० फुटावर एक-एक चेंबर आहे. प्रॉब्लेम असतो दोन फुटाचा. कर्मचारी खूपच कमी पडत आहेत. ठेकेदाराचे कामगार या रोडला कमी केल्यामुळे अचानक कोणी भेट दयायला आले तर आपले कर्मचारी मेन रोडला कामाला लावावे लागतात. मला आत्ताच काम न झाल्यामुळे शो कॉज नोटीस मिळाली आहे. ४ किंवा ५ कामगार एका प्रभागात दिले तर ते कसे सर्व काम करणार ? त्यात सन्मा.नगरसेवकांनी अर्जंट सांगितलेली कामे करणेसाठी आम्ही तेच कामगार तेथे फिरवतो.त्यामुळे १००% काम होतच नाही.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, आपल्याला तसे कर्मचारी वाढविण्याचे अधिकार नाहीत. परंतू तुम्हाला कर्मचारी वाढवून पाहिजेत, का पाहिजेत त्याबाबत वरच्या स्तरावर कळवले पाहिजे.

**श्री. प्रभाकर पवार, सन्मा. स्विकृत सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, ठेकेदारांवर आपल्या अधिका-यांचा अंकुश असणे आवश्यक आहे परंतू तसे दिसून येत नाही.

**श्री. पटनाईक,उप स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, खारेगांवसाठी माझ्याकडे ठेकेदाराचे फक्त १८ कामगार आहेत. जेथे २५ ते ३० कर्मचारी पाहिजेत तेथे १० कामगार काय काम करणार ?

**मा.अध्यक्ष :-**

अर्जुन पाटील या ठेकेदाराला का पाठीशी घालता ? सर्व सन्मा.सदस्यांची तक्रार आहे. तरीही त्याला काम का देता ? त्याला ब्लॅकलिस्ट करा. कामगारांना पगारही वेळेवर देत नाही.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

आकाशी साहेब, काम करणा-या कामगारांना ३,३-४,४ महिने पगार दिला नाहीतर ते काय काम करणार ? तेथे गैरहजर लोकांची हजेरी लावून ठेकेदार पैसे घेतो मात्र कामगारांना देत नाही.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, सर्व सन्मा.सदस्यांनी याबाबत तक्रार करावी. मी पाहतो.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, अधिका-यांना फोन केला तर अधिकारी,कर्मचारी डोंगरावर कामासाठी असतात. तेव्हा आम्ही सांगितले डोंगर भागासाठी एक पेटी दया. तिकडचे काम तिकडे होईल आणि इकडचेही काम व्यवस्थित होईल. याबाबत दांडेकरांनी रिपोर्ट केला आहे का ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, आमच्याकडून मुख्य कार्यालयात रिपोर्ट गेलेला आहे परंतू कार्यवाही प्रस्तावित आहे.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा.सहा.आयुक्त यांनी याकडे लक्ष दयावे, जेणेकरुन रिपोर्टबाबत कार्यवाही लवकर होईल.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, दांडेकर गाडीवर असले किंवा मिटींगमध्ये असले तर फोन उचलत नाहीत. परंतू नंतर फोन करीत नाहीत. आम्ही फोन केल्यानंतर तुमच्याकडूनही फोनची अपेक्षा असते.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझा फोन २४ तास चालू असतो कधीही बंद नसतो.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात सिव्हरेजचे काम सुरु होणार होते परंतू ते आम्ही सुरु करुन देणार नाही. तसे पत्र दिलेले आहे. ती जमिन शेतक-यांची आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय,शौचालयाची कामे ६० दिवसांत होणार होते. परंतू सन २००९-२०१० हे वर्ष पूर्ण झालेले आहे आणि काही भागात ५०%ही काम झालेले नाही. माझ्या प्रभागात १० सिट्सचे शौचालय तोडले. चांगले काम होतय म्हणून आम्ही ते तोडून दिले परंतू १ वर्ष झाले ते त्याच स्थितीत आहे. आम्ही जनतेला काय उत्तर देणार ? सिव्हरेजचे काम पारसिकनगरमध्ये झालेले आहे. काम चालू करीत असताना स्थानीक नगरसेकांना विश्वासात घेतले पाहिजे परंतू मला एका शब्दानेही सांगितलेले नाही. याचा अर्थ माझ्या भागात काय चाललेय याची मलाच कल्पना नाही. ही कामाची पध्दत आहे का ? विकास कामे आहेत तर सांगणे आवश्यक आहे.

**श्री.भिवापूरकर :-कार्य.अभियंता (ड्रेनेज)**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्यांच्या बाबत अशी चूक झाली होती परंतू बॉण्ड्रीमुळे आमच्या लक्षात आले नाही.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय,प्रश्न बॉण्ड्रीचा नाही. स्थनिक नगरसेवक म्हणून मला सांगणे आवश्यक होते. चांगल्या कामाला आमचा विरोध नाही, कामे झाली पाहिजेत. परंतू नागरिक फोन करुन विचारणा करतात तेव्हा आम्हांलाही समजले पाहिजे. मा.उपमहापौर संपूर्ण ठाणे शहराचे आहेत याची कल्पना आम्हांलाही आहे.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातही तसेच आहे. इंजिनीयर असोत की ठेकेदार ते काय करतात तर प्रभाग माझा आणि माजी उपमहापौर यांच्या घरी गेले, त्यांच्याशी बोलणी केली. काम माझ्या प्रभागात आणि बोर्ड त्यांच्या नावाचा. नागरिकांनी मला फोन केले, काही नागरिक माझ्या घरी आले की प्रभाग तुमचा आणि माजी उप महापौरांचे बोर्डवर नाव कसे ? मी भिवापूरकरांना सांगितले होते की काम करण्याअगोदर तेथे मिटींग घेऊ, लोकांना विश्वासात घेऊन काम सुरु करु. परंतू काम असे सुरु केले म्हणजें आपसात भांडणं लावून दयायचे काम करीत आहेत.

**श्री.भिवापूरकर :-कार्य.अभियंता (ड्रेनेज)**

मा. अध्यक्ष महोदय, ते काम नंतर बंद केले.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझी बोलणी झाली, सगळयांना समजावून सांगितल्यानंतर मी पुन्हा काम सुरु करण्यास सांगितले होते.  कोणी तेथे काम सुरु करण्यास आले नाही आणि आता पावसाळयात काम करणारच नाही. ते काम राहिल्यामुळे ई.सी.डब्ल्यू चे काम अडकले आहे.

**मा.अध्यक्ष :-**

सर्व सन्मा.सदस्यांची तुमच्याबाबत तक्रार आहे आणि पावसाळा किती दिवसांवर आला आहे याची कल्पना आहे का ? अनेक ठिकाणी प्रभागांमध्ये खणून ठेवले आहे, त्याचे काम कोण करणार आहे ? माझ्या प्रभागात माझा निधी वापरुन डांबरीकरण करुन घेतले.

**श्री.भिवापूरकर :-कार्य.अभियंता (ड्रेनेज)**

मा. अध्यक्ष महोदय, आम्ही डब्ल्यू.बी.एम करुन दिले होते.

**मा.अध्यक्ष :-**

त्यावर डांबर कोण टाकणार ? पाऊस जवळ आला तुम्ही काम करणार कधी ? काम कधी करायचे तुमच्या मनावर आहे का ?

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, ज्यांचे काम आहे त्यांनी ते पूर्ण करणे आवश्यक आहे.

**मा.अध्यक्ष :-**

गजानन नगरच्या येथे खेंादून ठेवले आहे ते काम केव्हा करणार ? पावसाळया आधि व्हायला हवे होते. गोपाळराव नगरच्या येथे ...

**श्री.प्रविण सापळे -उप अभियंता (ड्रेनेज) :-**

मा. अध्यक्ष महोदय, तेथील काम सुरु केले आहे. माती उचलली आहे. शनिवारपासून काम सुरु केले आहे. दोन दिवसांत काम पूर्ण होईल.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा-मुंब्रा विभागाचे मा.आमदार श्री.जितेंद्र आव्हाड साहेब यांनी कळवा नाक्यावरील ट्रॅफिकबाबत एक बैठक बोलविली होती. त्यावेळी असा विषय झाला की, कळवा नाक्यावरील शिवाजी महाराजांचा पुतळा आहे तो तेथून हलवून कळवा ब्रिजच्या येथे जागा आहे तेथे बसवायचा आहे , तोही लोकवर्गणीतून बनवायचा आहे.  यासाठी शासनाचा निधी घ्यायचा नाही.  लोकांना रहदारीसाठी त्रास नको या दृष्टीकोनातून विचार करुन सर्वपक्षीय सहकार्य केले तर चांगले काम होईल. तरी याबाबत एक ठराव करावा लागेल.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, आत्ताच ठराव करुन शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे, मेघडंबरीचे वगैरे काम केले आहे.  ५ लाखाच्या कामाचे ११.५० लाख महापालिकेने खर्च करुन काम केले आहे आणि गेल्या वर्षीच उद्घाटन केले आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रश्न असा आहे की ,जनतेच्या सोयीसाठी आपण चांगले काम करीत असू आणि तो महाराजांचा पुतळा दोन्ही ब्रिजच्या मध्ये लावला तर तेथील संध्याकाळची ट्रॅफिक जॅम होणार नाही. येथे भावना दुखावण्याचा प्रश्न नाही. तरी माझी सन्मा.सर्व सदस्यांना विनंती आहे की, आपण चांगलं काम करतोय तेव्हा याबाबत ठराव करा. आपण सर्व पक्षीय शासनाचा निधी न घेता लोकवर्गणीतून पुतळा बसविणार आहोत.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा नाक्यावर मुकुंद केणी यांचे सर्कलचे बांधकामही काढण्यांत आले आहे.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, काढलं म्हणजे त्यांना असं सांगितले गेले आहे की, त्यांना पुन्हा तसेच बांधून देऊ.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

सन्मा.सदस्या खातू मॅडम, हे चांगले काम आहे तेव्हा सर्व पक्षांनी पाठिंबा दयायला पाहिजे आणि अशी कितीतरी कामे आहेत की आज एक काम केले तर दुस-या दिवशी बंद पडले.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, मागच्यावेळी मा.आमदार जितेंद्र आव्हाड साहेब यांनी कळवा प्रभाग समितीतील सर्व नगरसेवकांची एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी कळवा नाक्यावरील ट्रॅफिकचा विषय सांगितला. ही ट्रॅफिक हटली पाहिजे त्यासाठी शिवाजी महाराजांचा पुतळा हलवला पाहिजे या गोष्टींबाबत चर्चा झाली. आजच्या सभेमध्ये सन्मा.सदस्यांची उपस्थिती कमी आहे आणि या विषयावर सविस्तर सर्वपक्षिय चर्चा होणे आवश्यक आहे. तेव्हा विशेष सभा यासाठी लावा व विषयपत्रिकेवर विषय येऊ देत त्यानुसार ठराव पारीत करता येईल. परंतू आत्ता घिसडघाईने निर्णय घेणे योग्य नाही. यामुळे वाद होऊ शकतील. आपण चांगले काम करणार आहोत, नागरिकांना सुविधा देणार आहोत. तेव्हा सर्वपक्षिय सभा होणे गरजेचे आहे आणि त्यावेळी सर्व सन्मा.सदस्य उपस्थित असणे गरजेचे आहे. आधि जी बैठक होती ती आचारसंहिता असल्यामुळे विषयपत्रिकेवर नव्हती. एका आठवडयाभरात अशी सभा लावण्यात यावी .

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे तेथे खारेगांव पारसिकनगर, मुंब्रा कडे जाणारे रिक्षावाले कश्याही रिक्षा लावून, तीन तीन लाईन करुन उभे असतात त्यांना हटविणे आवश्यक आहे.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, हा स्थानिक मुद्दा असल्यामुळे स्थानिक स्तरावर चर्चा करुन, ठराव मंजूर करावा लागेल व ती मंजूरी पुढच्या सभागृहामध्ये पाठविता येईल व तिथे मंजूरी होईल. परंतू इथेच एक वाक्यता झाली नाहीतर पुढच्या सभागृहात वादविवाद होऊ नये म्हणून एक सभा लावणे आवश्यक आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

भोईर साहेब माझे म्हणणे असे आहे की, हा विषय कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील आहे तेव्हा मा.महासभेमध्ये घेण्यापेक्षा कळवा प्रभाग समितीमध्ये निर्णय घेऊ कारण आपण लोकनिधीतून हे काम करणार आहोत. नगरपालिकेचा किंवा शासनाचा निधी आपण घेणार नाही. त्यामुळे मा.महासभेच्या मंजुरीचा प्रश्नच येत नाही.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, नियम असा आहे की, कोणताही पुतळा हलवायचा असेल तर त्याला मा.महासभेची मंजुरी घ्यावी लागते. त्यानंतर कलेक्टरची एन.ओ.सी.लागेल. म्हणूनच विषयपत्रिकेवर विषय घेऊन नियमानुसार ठराव केला पाहिजे. नंतर मा.महासभेमध्ये जाईल, चर्चा होईल, मंजूरी होईल त्यानंतर शासनाकडे जाईल. ही प्रोसिजर व्हायला वेळ लागेल. त्यानंतर पुतळा हटवायचा की नाही ते ठरेल.

**श्री.आकाशी - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदय, अश्या प्रकरणाबाबत मा.प्रभाग समिती स्तरावर विषय घेंता येतो की नाही ते ही पहावे लागेल.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, फक्त चर्चा करण्यासाठी विषय कळवा प्रभाग समिती सभेमध्ये घेता येईल व त्याची मंजूरी मा.महासभेमध्ये होईल.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, आम्ही सन्मा.नगरसेवकांचे तसे पत्र देतो म्हणजे विषयपत्रिकेवर विषय घेता येईल. पुढच्या स्तरावर पाठपुरावा आमदार साहेब करतीलच.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, पावसाळा आला की प्रत्येक वेळी चर्चा होते परंतू 'नेमेची येतो पावसाळा, ठेकेदार काम द्या, अधिकारी सुपरवायजिंग करा, गटारे साफसफाई होत नाही मग नगरसेवकांनी सभेमध्ये बोंबा मारा.' अशी परिस्थीती आहे. याबाबत ब-याचश्या गोष्टी माहित आहेत कारण मी उपमहापौर असताना प्रत्येक नाला पाहण्यासाठी गेलो आहे. सिव्हरेज असो,झाडांची छाटणी असो या गोष्टी मी पाहिल्या आहेत. त्यामुळे नालेसफाईच्या दिवशी ठेकेदाराची माणसे येतात थातुरमातुर नालेसफाई करतात. मग नगरसेवक म्हणतो माझ्या येथील नाला इथून साफ झाला नाही, तिथून साफ झाला नाही. ही सर्व ठिकाणची चर्चा महापालिकेच्या सभेमध्ये होत असते. स्वच्छता निरीक्षक नालेसफाई घेतात तेव्हा ठेकेदार त्या ठिकाणच्य नगरसेवकाला फोन करतात की नाही, त्या भागातील कोण नगरसेवक आहे याचीसुध्दा शहानिशा होत नाही. तरी नालेसफाई करताना त्या प्रभाग समितीचे अध्यक्ष, त्या भागातील नगरसेवक यांना कळविणे आवश्यक आहे व कशा पध्दतीने नालेसफाई व्हावी याबाबतच्या सूचना प्रत्येकवेळी दिल्या जातात. परंतू अधिकारी आज इकडे काम आहे, उद्या तिकडे काम आहे असे करतात. आज खरी गरज आहे प्रभाग समितीतील अंतर्गत गटारे साफ करण्याची. मागे मी सूचना केली होती, एका प्रभागामध्ये आठवडयाच्या कामाचे प्लॅनींग करा. तेथे एकदा काम केले की, परत महिनाभर त्या प्रभागात गेले नाहीतरी चालेल. परंतू कुठेही योजना राबवित नाही. यावर्षी योगायोगाने दुस-यावेळी नालेसफाई काही भागांत झाली. माझ्या प्रभागात करुन गेले परंतू पुढच्या प्रभागात नाले सफाई झाली की नाही याची मला कल्पना नाही. मा.महासभेमध्ये वर्षातून दोन वेळा नालेसफाई करण्याबाबत ठराव झालेला आहे.

परंतू प्रत्येक वर्षी दोनदा सफाई होतेच असे नाही त्यामुळे पावसाळा आला की सर्व नगरसेवकांची बोंबाबोंब होते. ठेकेदार काम करीत नसल्याने अधिकारीही हात बांधून असतात.

गेल्या आठवडयापासून मी सतत पाठपुरावा करतोय. थोडा भाग साफ झाला आहे आणि दोन-तीन ठिकाणचा भाग बाकी आहे त्यासाठी ठेकेदार आज येतो, उद्या येतो असे सांगतो. आज शेवटी सोमवारी साफसफाईसाठी ठेकेदार आला आहे. ठेकेदारावर अधिका-यांचा अंकुश असणे आवश्यक अधिकारी १०-१५ मिनीटे किंवा अर्धा तास साईटवर थांबतात आणि निघून जातात. मग ठेकेदार थातुरमातुर नालेसफाई करुन आम्हांला नाला साफ झाला असे सांगतो आणि ज्यावेळी त्या भागामध्ये पाऊस पडतो तेव्हा लोकांच्या रोषाला नगरसेवकाला सामोरे जावे लागते. अक्षरशः शिवीगाळ केली जाते. मग आम्ही अधिका-याला फोन करतो तेव्हा आम्हांला सांगतात ठेकेदाराने काम केले नाही. परंतू त्या ठेकेदारावर अंकुश कोणाचा आहे ? त्या कामाचा जो कोणी मुख्य अधिकारी आहे त्याचा त्या ठेकेदारावर अंकुश असणे गरजेचे आहे. त्यांची २०-२५ लोकांची टीम असते त्यावर आपला एकही मुकादम नसतो ही शोकांतिका आहे आणि त्यामुळे हे नाले व गटारे साफ होत नाहीत.

दुसरा प्रश्न आहे तो सिव्हरेजचा. सिव्हरेजचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. चेंबर तयार करताना आतल्या बाजूने प्लॅस्टर करतात मात्र बाहेरुन प्लॅस्टर नसते. तुम्ही प्रत्येक चेबर ओपन करुन पहा प्रत्येक ठिकाणी ही परिस्थिती दिसेल. फक्त त्या दिवशी मी स्वतः उभा राहिलो म्हणून बाहेरच्या बाजूने प्लॅस्टर केले.

जो रस्ता तयार केला ते काम पहाणे सिव्हरेजच्या अधिका-यांचे कर्तव्य होते. परंतू त्या ठिकाणी सुध्दा त्यांनी थातुरमातुर काम केलेले आहे. ३ नंबरची खडी टाकतात. पावडर टाकून लेवल करतात, मग डांबरीकरण करायचे परंतू आजच्या घडीला त्यांनी रोड तसाच ठेवलेला आहे आणि कुठेही डांबर टाकलेली नाही. मनिषानगरमध्ये, सन्मा.नगरसेवकांच्या प्रभागमध्ये रस्त्यावर ३ नंबरची खडी टाकून वर डांबर टाकून मोकळा झाला आहे. बाकी काहीही केलेले नाही. पैसा वाचवतात आणि ठेकेदाराचा फायदा होतो. आमचे जे.ई. असतात त्यांना तक्रार केली तर त्या ठेकेदाराला आमच्याकडे पाठवतात की ,त्यांना सांगा असं होऊ शकत नाही. पण कशा पध्दतीने काम करणार, त्यामध्ये काय मटेरियल वापरणार, क ामाची काय प्रोसेस आहे हे या जे.ई.नेच आम्हांला सांगितले तर कोणताही नगरसेवक मागे लागणार नाही !

प्रभाग क्र.५६ व ५७ मध्ये सन्मा.सदस्य मिलींद पाटील व माझ्या प्रभागात असे संयुक्तिक पहिलं सिव्हरेजच्या काम सुरु झाले. मागच्या जूनमध्ये उद्घाटन करुन काम सुरु झाले होते परंतू अद्याप कोणतेही काम पूर्ण झालेले नाही. सापळेंना फोन केला परंतू काम पूर्ण झाले नाही कारण या ठेकेदारावर अधिका-यांचा वचक नाही. त्यांचा काय ताळमेळ आहे मला माहित नाही परंतू या ठिकाणी काहीतरी ठेकेदाराशी साटलोट असल्याचा मी आरोप करतो आणि आरोप पुराव्यानिशी करीत आहे. त्यांनी जी सिव्हरेजची कामे प्रभागांमध्ये केलेली आहेत ती उघडावी तेथे दोन ते तीन इंचाची खडी व अर्धा इंच डांबर टाकला आहे आणि कमकुवत काम केले आहे. असे काम करीत करुन आपले अधिकारी त्यांना पाठिशी घालीत आहेत. आता पाऊस पडला की ते सर्व डांबर खाली बसेल. आणि असे झाले तर मा.आयुक्तांकडे आम्ही पत्र देऊ. आता नविन मा.आयुक्त आले आहेत ते ख-या अर्थाने व्हीजनवाले आहेत. ते अधिका-यांना सळो की पळो करुन सोडतील. नविन मा.आयुक्तांचे पहिले लक्ष आहे ते आरोग्य विभाग व साफसफाई. कचरा कुठेही पडलेला दिसता कामा नये. तशी तक्रार करण्यासाठी हेल्पलाईनही प्रभाग समिती वाईज सुरु करणार आहेत. घंटागाडया देणार आणि कंप्लेट आली की लगेच तिथे जाऊन कचरा उचलून घ्यायचा आहे. तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, जे खराब काम केलेले आहे ते तातडीने अधिका-यांनी व्यवस्थित करुन घ्यावे. कामचुकारपणा करुन ठेकेदार बिल घेणार असेल तर ते मिळणार नाही. ठेकेदाराला काम परवडत नाही तर त्याने बिलोचे टेंडर का भरावे ? मग तो त्याचा प्रश्न आहे आमचा नाही. ही योजना ४० वर्षासाठी असून केलेले काम फक्त १० वर्षामध्ये खराब होत असेल तर लोक आम्हांला चपलेने मारतील. अधिका-यांनी सुपरविजन करणे हे त्यांचे काम आहे आणि नगरसेवक जातीने तेथे उपस्थित राहतील परंतू त्यांना कळविले जात नाही ही शोकांतिका आहे. या

ठिकाणी जे अधिकारी दिलेले आहेत ते योग्य दर्जाचे आहेत असे मला तरी वाटत नाही. तरी याची नोंद अधिका-यांनी घ्यावी नाहीतर येणा-या मा.महासभेमध्ये याबाबतची लक्षवेधी मी देणार आहे.

वृक्षप्राधिकरणाबाबत बोलायचे झाले तर मागच्या वर्षी रात्री ११-११.३०वाजता वृक्ष पडून इंडिका गाडी त्याखाली सापडली. आता मी गेल्या २ आठवडयापासून पत्र दिलेले आहे की, माझ्या प्रभागामध्ये वृक्ष खूप वरपर्यंत गेलेले आहेत तरी ते वरुन छाटा. परंतू पावसाळा जवळ आला तरी अद्यापही छाटणी झालेली नाही. तरी ही गोष्ट मा.सहा.आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर पहावी. आम्हांला सांगितले जाते की,ट्रॉलीचा ड्रायव्हर गैरहजर आहे. परंतू दुसरी ट्रॉली किंवा ड्रायव्हर नाही का ? सर्व प्रभागांतील इलेक्ट्रिक पोलवर तसेच लाईन्सवर आलेल्या फांदया छाटणे आवश्यक आहे. झाडे उंच वाढल्यामुळे मुळासकट पडतात. ती वरुन छाटली तर उंच होणार नाहीत. एक झाड लावून मोठे व्हायला ५-६ वर्ष जातात.

विद्युत विभागाच्या बाबतीत म्हटले तर सभेमध्ये कोणीही अधिकारी उपस्थित रहात नाही. तसेच ठेकेदारही संपर्कात रहात नाही. आमच्या प्रभागामध्ये संध्याकाळी सव्वा सहा वाजता लाईट लागलेले असतात व सकाळी उशिरापर्यंत चालू असतात. दिवस मोठा असल्यामुळे संध्याकाळी सात-सव्वा सात वाजता अंधार होतो. याकडे कुणीच लक्ष देत नाही. कधी दिवस लहान असतो,कधी मोठा असतो त्यानुसार लाईट चालू/बंद करणे आवश्यक आहे. या गोष्टी नगरसेवकांनी सांगायच्या का ? ठेकेदाराला फोन केला तर तो म्हणतो, हे माझे काम नाही. इथल्या अधिका-यांचा फोन लागत नाही म्हणून पोटे साहेबांना फोन केला तर ते मला एवढयाश्या कामासाठी फोन करता असे होते.

१ मेच्या दिवशी दरवर्षी कळवणदेवीची यात्रा असते. दरवर्षी रस्त्यांची दुरुस्ती, डांबरीकरणाची कामे आम्ही करुन घेतो. यावर्षीही रस्त्यावर खड्डे पडलेले होते व त्याबाबत पत्र दिले होते परंतू आचारसंहितेचे कारण सांगून रस्त्यांची डागडुजी केली नाही ही शोकांतिका आहे. ५०-६० हजार लोक तेथे येतात. वर्षातून एकदा ही यात्रा असते आणि पत्र दिल्यानंतर काम होणे आवश्यक होते असे मला वाटते. नागरिकांचा रोष आम्हांला पत्करावा लागला आहे. त्यानंतर किती ठिकाणी पॅचवर्कचे काम केले आहेत त्याचे फोटो माझ्याकडे आहेत. ज्या गोष्टी आम्हांला पटत नाहीत त्या कधीही पटवून घेतल्या जाणार नाहीत. कळवा स्टेशनला रोजचे किती नागरिक जातात त्यांना त्या खडयातून जावे लागते. अजून ती फाईल पूर्ण झालेली आहे. तरी ही कामे तातडीने करा. तुमचे काम तुम्ही व्यवस्थित, चांगल्या पध्दतीने केले तर आम्हांला येथे सभागृहामध्ये बोलण्याची काहीही गरज नाही. या ठिकाणी अधिकारी कोणीही येऊ देत त्यांच्या डायरीमध्ये नोंद असू देत की दरवर्षी १ मेच्या अगोदर यात्रेच्या ठिकाणच्या रस्त्यांची डागडुजी झाली पाहिजे. असे झाले नाही तर वरच्या सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली जाईल यांची नोंद घ्या. मग ते सिव्हरेज असो,ड्रेनेज असो, साफसफाई असो, वृक्ष प्राधिकरण असो, विद्युत असो. इथे मी केलेले आरोप पटत नसतील तर तसे मला सांगा.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, सन्मा.सदस्य भोईर साहेबांनी गांवदेवी यात्रेच्यावेळी रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सांगितले होते. परंतू त्या वेळेस कोणत्याही प्रकारचे बजेट आलेले नव्हते. आचारसंहिता होती. फाईल तयार केली होती आणि मंजूरीशिवाय काम करु शकत नव्हतो. ९-१० लाखाचे काम होते त्यामुळे ते करता येणे शक्य नव्हते. दुसरे त्यांनी कळवा स्टेशनच्या रस्त्याबाबत सांगितले तेथे खोदलेले होते. खारेगांव फाटक ते कळवा स्टेशनचा रस्ता आपण साफसफाई, दुरुस्ती करुन पूर्ण केलेला आहे.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा स्टेशनच्या जवळच्या रस्त्याबाबत बोललो होतो.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा.अध्यक्ष महोदय, तेथें ड्रेनेज विभागाचे काम चालू होते. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती तेच करणार. तरी मी उद्या श्री. कदम यांना पाठवतो व पाहून घेतो.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, मी जे आरोप केले आहेत त्याबाबत मला उत्तर हवे आहे. तसे मिनीट्सही झालेले आहेत.

**श्री.प्रविण सापळे -उप अभियंता (ड्रेनेज) :-**

मा. अध्यक्ष महोदय, सदरील ठेकेदार हा योग्यप्रकारे काम करीत नसुन त्याबाबत ठेकेदारास नोटीस देण्यांत आलेली असून त्याने न केलेल्या कामाची रिस्क ॲण्ड कॉस्टवर टेंडर काढण्याची कार्यवाही विभागामार्फत चालू करण्यांत आलेली आहे. ठेकेदाराकडून खोदण्यांत आलेल्या सर्व खड्यांमध्ये पावसाळयापूर्वी डब्ल्यू.बी.एम व बी.एम.ए.सी.करुन घेण्यात येत असून हे काम चालू आहे.

**मा.अध्यक्ष :-**

पावसाळया अगोदर काम होईल असे पहावे. सध्याच्या परिस्थितीमुळे मला वाटत नाही कोणताही नगरसेवक तुम्हांला पुढे काम करुन देईल.

**श्री.प्रविण सापळे -उप अभियंता (ड्रेनेज) :-**

मा. अध्यक्ष महोदय, आज मिटींग आहे. आम्ही काम करुन घेतो.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**प्रकरण क्रमांक १ - विषय** : मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - ११.०३.२०१० व दि. १५.०३.२०१०(विशेष सभा) रोजीच्या सभेंचे इतिवृत्तांत मंजूर करणे.

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - १,दिनांक -३१.०५.२०१०**

**ठराव**

प्रकरण क्रमांक १ पाहतां, मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक ११.०३.२०१० व दि. १५.०३.२०१०(विशेष सभा)रोजीच्या सभांचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक -** श्री. उमेश पाटील | **अनुमोदक -** श्री.अशोक भोंईर

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

:-:-:-:-:-:-:-:

(त्यानंतर राष्ट्रगीत म्हणण्यात आले व मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.)

**सभा संपल्याची वेळ** :- दुपारी २.१५वाजता.
**दिनांक** :- ३१.०५.२०१०
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सही/- प्रभावती भालेराव,
**प्रभाग अधिकारी**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**